**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९८५/२००८**

**१) श्री कैलास चिंतामणराव थोरात**
**व्ही.एच.बी.कॅालनी, एम.आय.जी.७२**
**इमारत क्रं.१/४, गौरक्षण रोड, अकोला** — **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, अकोला**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक**
**सहकारी संस्था, अकोला, गंगाधर प्लॅाट ता.जि.अकोला.** — **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक व माहिती अधिकारी तथा तालुका सहाय्यक निबंधक हे गैरहजर. सहकार अधिकारी यांना उपस्थित राहाण्याकरीता जिल्हा उपनिबंधकानी प्राधिकृत केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१०.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

" **माहितीचा विषय** : श्री गजानन शासकिय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्था अकोला, र.नं.१०५८ सन १९९५ ते २००२ व सन २००४ ते २००६ या कालावधीतील लाभांश वाटपाबाबत. माहितीशी संबंधीत कालावधी: सन १९९५ ते सन २००२ ते सन २००४ ते २००६. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : सन १९९५ ते २००२ व सन २००४ ते २००६ या कालावधीतील भाग

भांडवलदारांची वर्षनिहाय यादीची सत्यप्रत दयावी. २) सन १९९५ ते २००२ व सन २००४ ते २००६ या कालावधीतील लाभांश वाटप केलेल्या भागधारकाची वर्ष निहाय यादीची सत्यप्रत दयावी. ३) अ.क्रं. म व अं.क्रं.२ मधील संख्येत तफावत असल्यास त्याबाबत संस्थेने केलेल्या कार्यवाहीची भागभांडवलदार निहाय रक्कमेचे नियोजनाची माहिती त्याबाबत घेतलेले ठराव, इत्यादी संपूर्ण माहितीच्या वर्ष निहाय सत्य प्रती दयाव्या. ४) सन १९९५ ते २००२ व सन २००४ ते २००६ या कालावधीमध्ये ज्या भागधारकांना लाभांश दिला नाही, त्यांची नांवे, लाभांशाची रक्कम इत्यादीच्या यादीची सत्यप्रत वर्षनिहाय दयावी. ५) दि. ६.१०.२००६ ला राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडे व्यवस्थापक हयांनी वकीला मार्फत सादर केलेला लेखी जबाब व under posting certificate च्या पावतीची सत्य प्रत दयावी. " सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.११.२००६ रोजी अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही संस्था स्तरावरील असल्यामुळे तसेच सदरील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे उपरोक्त माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००६ रेजी उपनिबंधक सहकारी संस्था तालुका अकोला यांचे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (३)(ब) कडे लक्ष वेधून सदरचा अर्ज हा हस्तांतरीत करावयास पाहिजे होता असे त्यांच्या निदर्शनास आणलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक २२.१२.२००६ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था तालुका अकोला यांनी अध्यक्ष/सचिव श्री गजानन शासकिय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्था यांचेकडे हस्तांतर केलेला दिसून येतो. त्यावर दिनांक ८.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांना मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे जावक क्रमांक १७१० दिनांक ८.२.२००६ चे पत्रानुसार सध्या केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा संस्थेस लागू नसल्यामुळे आपण मागणी केलेली माहिती दिनांक २७.१०.२००६ च्या अर्जानुसार आपणास पुरविता येणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी जिल्हा उपनिबंधक तथा अपीलीय अधिकारी, सहकारी संस्था यांचेकडे प्रथम

अपील दाखल केलेले दिसून येते. व सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २७.२.२००७ रोजी देण्यात आलेला असून श्री गजानन शासकिय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. अकोला रजिस्टर नंबर १०५८ ही संस्था तालुका स्तरावरील असून ती तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांचे वैधानिक अधिकार कक्षेत येते. केंद्रिय शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तालुका स्तरावरील सहकारी संस्थेचे प्रथम अपीलीय अधिकारी हे तालुका उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला आहे. त्यामुळे अपीलार्थी यांनी संस्थेने त्यांना माहिती न दिल्याबाबतचे प्रथम अपील तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे दाखल करावे व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये खालीलप्रमाणे लेखी खुलासा दाखल केलेला आहे.

" अर्जदार आपल्या नमूना - क माहिती विहित जोडपत्रासह सदरचे विस्तृत निवेदन अवलोकनार्थ सादर करीत आहे.

(२) ज्याअर्थी अर्जदाराने शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, अकोला यांचेकडे नमूना अ मधील जोउपत्रात दिनांक २७.१०.२००६ अन्वये माहिती मागितली. (प्रत जोडली आहे) त्याअर्थी शासकीय माहिती अधिकारी हयांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (१) अन्वये ३० दिवसात विहित करण्यात येईल अशा फि चे प्रदान केल्यावर माहिती पुरवेल किंवा कलम ८ व ९ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कारणांवरुन माहिती फेटाळून लावेल. तसेच जर माहिती अन्य प्राधिकरणाच्या कामकाजांशी संबंधीत असेल तर असा अर्ज जास्तीत जास्त पाच दिवसात संबंधीत प्राधिकरणाकडे पाठविल व कलम ६(३) (ब) नुसार अर्जदारास तसे कळविल.

(३) गैरअर्जदार क्रं.१ यांनी मात्र त्यांना दिनांक ३१.१०.२००६ रोजी अर्ज मिळाल्यावर तब्बल दहा दिवसांनी त्यांचे पत्र क्रं.३९९५ दि. १०.११.२००६ अन्वये (प्रत्यक्षात प्राप्त दि. ६.१२.२००६)

अर्जदारास असे कळविण्याची तसदी घेतली की, सदर माहिती ही संस्था स्तरीय असल्यामुळे तसेच सदरील माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे उपरोक्त माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी ( प्रत सोबत जोडली आहे.)

(४) ज्याअर्थी अर्जदारास संबंधीत संस्थेच्या भ्रष्ट कारभाराची जाणिव आहे व भ्रष्ट कारभार शासनाचे लक्षात आणून द्यावा म्हणून अर्जदारासह आणखी ही काही भागभांडवलदारांनी गैरअर्जदार क्रं. १ यांचेकडे तक्रारी केलेल्या आहेत, त्याअर्थी सदर संस्था अर्जदाराचा कोणताही कागद स्विकारीत नाही. तसेच राज्य मुख्य माहिती आयुक्त मुंबई यांनी अपील क्रं. ४४६/०२ मधील दिनांक ०७/१०/२००६ चे आदेशान्वये अर्जदारास संस्थेच्या कारभाराविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांचेशी संपर्क साधावा असा आदेश पारीत केला आहे (प्रत सोबत जोडली आहे). म्हणून अर्जदाराने गैरअर्जदार क्रं. १ चे सदर संस्थेचे वैधानिक नियंत्रण अधिकारी आहेत त्यांचेकडे नमूना अ मधील माहितीसाइी आग्रह धरला. मात्र गैरअर्जदार कं. १ यांनी वरील परिच्छेद ३ नुसार सदर अर्जाबाबत मला कळविले.

(५) ज्याअर्थी शासकिय माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अकोला म्हणजेच गैरअर्जदार क्रं. १ हयांनी घेतलेली परिच्छेद क्रं.३ मधील भुमिका सदर अधिनियमाचे कलम ६ ७३) ७ब) चे उल्लंधन करणारी आढळून आली. त्या अर्थी अर्जदाराने सदर बाब गैरअर्जदार क्रं. १ चे निदर्शनास आणून देणे भाग पडले. परिणामी अर्जदाराने आपले पत्र दिनांक १३.१२.२००६ अन्वये सदर बाब गैरअर्जदार क्रं. १ चे निदर्शनास आणून दिली. (सोबत प्रत जोडली आहे.)

(६) अर्जदाराचे विनंतीचा विचार मान्य करुन गैरअर्जदार क्रं.१ यांनी अर्जदाराचा मुळ अर्ज संबंधीत संस्थेकडे पत्र क्रं.४४९३ दिनांक २२.१२.२००६ अन्वये संस्थेने माहिती पुरवावी असे निर्देश करुन पाठविला. म्हणजेच अर्जदाराचा दिनांक ३१.१०.२००६ रोजी प्राप्त झालेला अर्ज संबंधीत संस्थेकडे दिनांक २२.१२.२००६ रोजी म्हणजेच तब्बल ५२ दिवसांनी पाठविला व कलम ६ (३) (ब) ची पुरेशी वाट लावली ही बाब स्पष्टच होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी गैरअर्जदार क्रं. १ यांना जे महाराष्ट्र शासनाचे वर्ग २ चे राजपत्रित अधिकारी

आहेत सदर तरतुदी माहिती नाही असा अर्थ काढणे पुरोगामी महा. शासनाचा अवमान ठरेल आणि तरीही गैरअर्जदार शासकिय धाटणीची उत्तरे देऊन जन सामान्यांची कशी बोळवण करतात आणि अडचणीत येणा-या तरतूदी पध्दतशीरपणे कशा दुर्लक्षीत करतात ही बाब येथे स्पष्ट झाली. आयोगाला विनंती आहे की या प्रवृत्तीची आयोगाने दखल घ्यावी.

(७) परिच्छेद ४ मध्ये विषद केलेला अनुभव अर्जदारास संबंधीत संस्थेकडून या प्रकरणीही आला. संबंधीत संस्थेने आपले पत्र क्रं. ७५ दिनांक ८ जानेवारी २००७ अन्वये अर्जदारास असे कळविले की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा संस्थेला लागू नसल्यामुळे मागणी केलेली माहिती पुरविणे शक्य नाही. (प्रत सोबत जोडली आहे) त्याची प्रत गैरअर्जदार क्रं. १ यांनाही दिलेली आहे.

(८) ज्या अर्थी सदर संस्थेने परिच्छेद ७ मधील भूमिका घेतली व त्याची प्रत गैरअर्जदार क्रं. १ यांनाही दिली त्या अर्थी गैरअर्जदार क्रं.१ जे संस्थेचे वैधानिक नियंत्रण अधिकारी आहेत त्यांचेकडून आवश्यक कार्यवाहीची अपेक्षा अर्जदाराने केली परंतु गैरअर्जदार क्रं.१ हयांनी काहीही कार्यवाही केली नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, गैरअर्जदार क्रं. १ हे स्वतः व श्री गजानन शास. दुध योजना सह पतसंस्था अकोला र.नं. १०५८ हे दोघेही माझे मा. मुख्य आयुक्त, राजय माहिती आयोग मुंबई यांचे कडील अपील क्रं.४४६/०६ सुनावणी दिनांक ०६/१०/००६ रोजी मुंबई येथे आयोगासमोर हजर होते व माहितीही पुरविली जी सह.पत मा.सहकार आयुक्त व निबंधक सह.संस्था पुणे यांचे पत्र क्रं.१७१० दि. ८/२/२००६ चे पत्राचा उल्लेख करुन सदर अधिनियमच संस्थेला लागू नाही असा पवित्रा घेते व या पत्रावर गैरअर्जदार कं.१ काहीही कारवाई करीत नाहीत. त्याअर्थी एक शास.अधिकारी स्वतःच गैरप्रकारांना संरक्षण देतो ही बाब स्पष्ट होते. अन्यथा दि. ८.२.२००६ चे पत्राबाबत दि. ६.१०.२००६ रोजी मा. मुख्य आयुक्तांसमोर याबाबत चर्चा कां केली नाही व माहिती कां पुरविली ही बाब स्पष्ट होणे गरजेचे आहे. त्यामुळे तालुका उप निबंधक सह. संस्था जे गैरअर्जदार क्रं. १ आहेत त्यांचा हेतू प्रामाणिक नाही ही बाब मा.आयुक्त माहिती आयोग यांनी

विचारात घ्यावी अशी अपीलार्थीची विनम्र प्रार्थना आहे. कारण सदर अधिनियमाचे कलम २ (३)(ज)(ग) मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्याही अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे सह आयुक्तांचे पत्र सदर अधिनियमाला बाधा आणू शकत नाही.

(९) अर्जदाराने यापूर्वी राजय मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांचेकडे संस्थेच्या अशाच प्रकारच्या असहकाराबाबत अपील दाखल केले होते. सदर अपील क्रं.४४६/०६ मध्ये राज्य मुख्य माहिती आयुक्त मुबई यांनी ठेवलेल्या तारखेवर दिनांक ६.१०.२००६ रोजी हीच संस्था आपल्या वकिलांसह व गैरअर्जदार क्रं. १ सह मुंबई येथे हजर होती. मात्र संस्थेने येथे सदर अधिनियम लागू नसल्याचा मुद्दा उपस्थित केलेला नाही. परिणामी राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी अर्जदाराचे अपील सदर नियमाखालीच निकाली काढून अर्जदारास माहिती पुरविली. सहकार आयुक्तांचे पत्राचे तारखेनंतर राज्य माहिती आयोगाने निर्णय दिल्याने सदर पत्र बेदखल होते.

(१०) ज्याअर्थी गैरअर्जदार क्रं. १ जे स्वतः सदर संस्थेसोबत दिनांक ६.१०.२००६ रोजी राज्य मुख्य माहिती आयुक्तांसमोर मुंबई येथे हजर होते, त्या अर्थी संस्थेने सदर अधिनियम लागू नसल्याची जी भूमिका घेतली, त्यांचेकडून कठोर कारवाईची अपेक्षा होती ती त्यांनी पार न पाडल्याने गैरअर्जदार क्रं. १ हेच सदर संस्थेला माहिती न पुरविण्यासाठी व भ्रष्ट कारभार उजेडात येवू नये म्हणजे संपूर्ण मदत करीत आहेत असे स्पष्ट होते.

(११) ज्याअर्थी संबंधीत संस्था व गैरअर्जदार क्रं. १ हे संगणमताने माहिती मिळू नये म्हणून प्रयत्नरत असल्याचे स्पष्ट झाल्याने अर्जदारास सदर अधिनियमाचे कलम १९ (१) खाली जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे अपील दाखल करणे भाग पडले.

(१२) अर्जदाराने जोडपत्र ब नुसार प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांचेकडे दिनांक ५.२.२००७ रोजी अपील दाखल केले (प्रत सोबत जोडली आहे).

(१३) अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,अकोला यांनी अर्जदाराचे अपील प्रकरणी संबंधीताची बाजू ऐकून घेण्याकरीता दिनांक १४.२.२००७ रोजी सुनावणीचे पत्र

अर्जदार व गैरअर्जदार कं. १ हयांना दिनांक ८.२.२००७ रोजी देवून सुनावणी पुर्ण केली. (प्रत सोबत जोडली आहे.)

(१४) ज्या अर्थी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अकोला म्हणजेच गैरअर्जदार क्रं. २ यांनी दिनांक १४.२.२००७ रोजी सुनावणी ठेवली त्याअर्थी अपीलकर्ता अर्जदार व गैरअर्जदार क्रं. १ यांनी आपली लेखी स्वरुपात त्यांचे समोर बाजू मांडली (दोन्ही लेखी निवेदनाच्या प्रती जोडल्या आहेत ).

(१५) ज्याअर्थी अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अकोला यांनी सदर अधिनियमांचे कलम १९ (१) खालील अपील दाखल करुन घेतले व त्यावर दिनांक १४.२.२००७ रोजी सुनावणी केली त्याअर्थी अर्जदारास सदर अधिनियमानुसार व अर्जदाराने मांडलेल्या लेखी मुद्यांचा परामर्श घेवून माहिती पुरविणे अपेक्षित होते. परंतु, गैरअर्जदार क्रं. २ यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी अपीलावर निर्णय दिला. (प्रत सोबत जोडली आहे) सदर निर्णयानुसार खालील आदेश पारित करण्यात आला.

श्री गजानन शासकीय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्था, अकोला र.रं. १०५८ ही संस्था तालुका स्तरीय असून ती तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांच्या वैधानिक अधिकार कक्षेत येते. केद्र शासनाच्या माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत तालुकास्तरीय सहकारी संस्थाचे प्रथम अपीलीय अधिकारी हे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अकोला आहेत त्यामुळे अपीलार्थी संस्थेने त्यांना माहिती न दिल्याबाबतचे प्रथम अपील तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अकोला यांचेकडे दाखल करावे.

अपीलार्थी यांनी या कार्यालयाकडे दाखल केलेले अपील हे योग्य अपीलीय प्राधिकरणासमोर दाखल न केल्यामुळे हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(१६) आदरणीय महोदय येथे असा प्रश्न उपस्थित होतो की, जोडपत्र अ दिनांक २७.१०.२००६ हे तालुका उपनिबंधक तथा माहिती अधिकारी यांचे नावाने सादर केले असल्यामुळे री गजानन शासकीय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्थेचे असहकाराचे किंबहूना कागदही न स्विकारण्याचे धोरण असल्यामुळे अर्जदाराने संस्था जया वैधानिक अधिकार

कक्षेत येते त्यांचेकडे म्हणजेच गैरअर्जदार क्रं. १ यांचेकडे माहिती मागण्याशिवाय पर्याय नाही. संबंधीत संस्था ज्यांचे वैधानिक अधिकार कक्षेत येते त्यांचे दिनांक २२.१२.२००६ चे पत्राची सुध्दा दखल घेण्यास व माहिती पुरविण्यास कशी पध्दतीशरपणे खोटेपणाने माहिती देण्याचे टाळते हे संस्थेच्या दिनांक ८ जानेवारी, २००७ चे पत्रातून स्पष्टच झालेले आहे.

यापूर्वी अर्जदाराने राज्य मुख्य माहिती आयुक्त मुंबई यांचे अपील क्रं.४४६/०६ मध्ये सुध्दा हाच बेजबाबदारपणा सिध्द झालेला आहे.

(१७) संस्थेचे भ्रष्ट व बेजबाबदारपणाचे कामकाजावर पांघरुण घातले जावू नये म्हणून अर्जदार प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असतांना सहकार विभाग मात्र अर्जदारास सहाय्य करण्याऐवजी संस्थेला त्यांचे भ्रष्ट व बेजबाबदार कार्याबध्दल मदत करण्याची भूमिका पार पाडतो आहे ही बाब मुद्दा क्रं. ३ व १५ मध्ये स्पष्टच झालेली आहे.

(१८) परिणामी अर्जदाराने त्यांचे कलम १९ (१) खालील अपील फेटाळल्याने सदर अधिनियमाचे मुळ हेतूलाच बाधा निर्माण झाल्यामुळे कलम १८ (१) (क) (ख) (ग) बाधीत होत असल्यामुळे आपणाकडे कलम १९ (३) खाली अपील दाखल करणे भाग पाडले गेले आहे. माहिती मिळण्याचा हक्क आबाधित रहावा व पदनिर्देशित अधिका-यांनी माहिती पुरविण्यास मदतच केली पाहिजे अशी धारणा असल्याने सदर अपील करावी लागली.

प्रार्थना :-

अर्जदार विनम्रपणे विनंती करतो की, सदर अधिनियमानुसार माहिती मिळण्यासाठी शासकिय माहिती अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांनी मदत करण्याऐवजी अर्जदार कसा हतबल होईल असाच प्रयत्न केला आहे. अन्यथा खालील बाब घडणे शक्य नव्हते.

(१) राज्य मुख्य माहिती आयुक्तांचे अर्जदाराच्या अपील मधील आदेशाचे अनुषंगाने शासकिय माहिती अधिकारी तथा गैरअर्जदार क्रं.१ हयांचेकडे माहिती मिळण्याकरिता जोडपत्र अ मध्ये दिनांक २७.१०.२००६ चा अर्ज प्रत्यक्ष भेटून सादर केल्यानंतरच नेमका या प्रकरणी कोणत्या माहिती अधिका-याकडे अर्ज सादर करावा असे मार्गदर्शन करण्याऐवजी व अशी संस्था अर्ज किंवा कोणताही कागद स्विकारत नाही हे कळविल्यावर तसेच सदर अधिनियमाचे ६

(३)(ब)प्रमाणे कार्यवाही झाल्यावर संस्थेने सदर अधिनियमच लागू नाही असे कळविल्यावर गैरअर्जदार क्रं.१ हयांनी कोणतेही मार्गदर्शन केलेले नाही हे असे कां घडावे.

(२) गैरअर्जदार क्रं. २ हे जिल्हयाचे प्रमुख आहेत. जर प्रथम अपिलीय अधिकारी हे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था आहेत तर गैरअर्जदार क्रं. २ हयांनी अर्जदाराचे अपील गैरअर्जदार क्रं. १ कडे पाठविणे आवश्यक होते व तशी माहिती अर्जदारास देवून सहकार्य करता येणे सहज शक्य होते.

(३) अर्जदाराने अपील सुनावणीचे वेळी दिनांक १४.२.२००७ रोजी आपले म्हणणे लेखी स्वरुपात मांडले व संस्थेला हा अधिनियम कसा लागू आहे हे राजय मुख्य आयुक्तांकडील अपील क्रं.४४६/०६ मध्ये झालेले आदेश देवून स्पष्ट केल्यावरही लेखी निवेदनातील मुद्यांचा परामर्श त्यांनी आपले आदेशांत कां करु नये. सदर मुद्ये अडचणीचे असल्याने अर्जदारास नव्याने तालुका उपनिबंधकाकडे अपील दाखल करण्याचे आदेश देणेच गैर आहे.

(४) संस्था/तालुका उपनिबंधक व जिल्हा उपनिबंधक हे सर्व एकमेकांस सहकार्य करण्याच्या भूमिकेतून व अर्जदारास माहिती मिळू न देण्याचे उद्दीष्ट ठेवून काम करीत असल्याने अर्जदारास या संपूर्ण यंत्रणेच्या संशयास्पद कार्याचा समाचार घेवून न्याय मिळावा.

(५) (अ) गैरअर्जदार क्रं.१ यांनी सदर अधिनियमांचे कलम ६ (३)(ब) चे उल्लंघन करणे.

(ब) सदर अधिनियम संस्थेस लागू असल्याचे माहिती असूनही संस्थेचे प्रत्रावर चुप्पी साधणे.

(क) माहिती मिळवून देण्यास मदत करण्याऐवजी माहिती कशी पुरविल्या जाणार नाही अशी भूमिका ठेवून काम करणे.

या बाबीमुळे गैरअर्जदार क्रं. १ यांची भूमिका संशयास्पद झाल्यामुळे कलम २० (१) नुसार त्यांचेवर रुपये २५०००/- एवढी शास्ती लादावी व शासनाच्या माहिती पुरविण्याच्या धोरणाशी विसंगत वागणूक ठेवल्याबध्दल कलम २० (२) अन्वये शिस्तभंग विषयक कारवाई करावी व कलम १८ (२) नुसार त्यांची चौकशी व्हावी अशी विनम्र प्रार्थना आहे.

(६) प्रथम अपीलीय अधिकारी हे जिल्हयाचे प्रमुख असल्याने संबंधीत संस्थेचे व गैरअर्जदार यांचे भूमिकेबाबत चुप्पी साधतात व माहिती पुरविण्याचे आदेश देणे ऐवजी शास.धाटणीचे आदेश पारीत करतात त्यामुळे त्यांचेवर कलम २० (१) अन्वये रुपये २५०००/- एवढी शास्ती लादली जावी.

(७) श्री गजानन शास.दुध योजना सह.पत संस्था अकोला यांनी माहिती पुरविण्यास नकार दिल्याबध्दल त्यांनाही माहिती अधिकारी समजून कलम २० (१) अन्वये रुपये २५०००/- एवढी शास्ती लादावी व संस्थेच्या संशयास्पद भूमीकेसाठी कलम १८ (२) अन्वये स्वतंत्र चौकशी सुरु करावी अशी प्रार्थना आहे. सविनय सादर. "

५. सदरच्या प्रकरणामध्ये उपस्थित असलेले सहकार अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या तालुका उपनिबंधक यांचे निर्णया नंतर अपीलकर्ता यांनी तालुका उपनिबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले नाही. व त्यामुळे संबंधीत सहकारी संस्थेच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा आदेश पारीत केलेला दिसून येत नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे त्याच्या खुलाशाप्रमाणे व तोंडी युक्तीवादाप्रमाणे त्यांचे म्हणणे असे आहे की, राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे पुर्वीचे अपील क्रमांक ४४६/२००२ मध्ये त्याच संस्थेचे व्यवस्थापक यांनी त्यांना दिनांक ६.१०.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावरुन सदरच्या सहकारी संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम हा लागू आहे व त्यामुळे जिल्हा उपनिबंधक किंवा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्या संस्थेच्या विरुध्द कार्यवाही करावयास पाहिजे होती असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांना कोणत्याही प्रकारचे दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार नाही. सदरची दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार कलम २० प्रमाणे राज्य माहिती आयोगास आहेत. त्यातही सदरच्या सहकारी संस्थेनी शासनाच्या दिनांक ८.२.२००६ च्या परिपत्रकाचा आधार घेतलेला दिसून येतो. वास्तविक सदरचे परिपत्रक हे सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांना कोणत्याही प्रकारचा अधिकार हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नसताना काढण्यात आलेले आहे. अर्थात, ते त्यांचे अभिप्राय आहे व त्यामुळे अभिप्राय हे अधिनियमाच्या तरतूदींशी सुसंगत नसल्यास रद्द ठरतात.तरी सुध्दा सदरच्या परिपत्रकाचा

आधार हा बहुतांश सहकारी पत संस्था व सहकारी नागरी बँका हया घेताना दिसतात व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत असतात. त्यातही श्री गजानन शासकिय दुध योजना कर्मचारी पत संस्था मर्या. यांस जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून आर्थिक मदत होत असतात तसेच सदरची आर्थिक मदत ही कर्ज रुपाने होत असली तरी सदरचे कर्ज नाबार्ड कर्जाच्या रुपाने असतात. म्हणजेच एका अर्थाने शासकिय आर्थिक मदत ही सदरच्या सहकारी संस्थेस मिळात असते.

६. असे असले तरी, कोणत्याही सहकारी संस्थेस आर्थिक मदत प्रत्यक्ष किंवा अप्रत्येक्षपणे जरी मिळत नसली तरी सहकारी संस्था ही सभासदांच्या भाग भांडवलावरच स्थापन होते.. सहकारी संस्था स्थापन करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतूदी प्रमाणे पंजीबध्द करावी लागते. व त्या सहकारी संस्थेवर संपुर्ण सहकार विभागाचे नियंत्रण असते. संचालक मंडळाची निवडणुक ही सहकारी अधिकारी यांचे नियंत्रणाखाली होते. संस्थेस लेखा परीक्षण करुन द्यावे लागते व त्याचा अहवाल सहकार निबंधक यांना सादर करुन वार्षिक अहवाल सर्वसाधारण सभेत प्रत्येक सभासदास द्यावा लागतो. व त्यामुळे कोणतीही माहिती ही गोपनीय राहात नाही. वार्षिक सर्वसाधारण सभा ही अधिनियमाचे तरतूदीप्रमाणे सहकार वर्ष संपावयाचया आधी घेऊन तसे शासनास कळवावे लागते. इ. प्रकारचे नियंत्रण हे अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे आहे.सदरचे नियंत्रण हे सहकारी संस्था ही सहकारी तत्वावर असल्यामुळे व त्यात सार्वजनिक व्यापक हित असल्यामुळे कोणत्याही प्रकारची हानी पोहचू नये त्याकरीता असल्यामुळे सहकारी संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येतील राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या अधिनियमान्वये या निकषामुळे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून अंर्तभाव होतो. श्री गजानन शासकिय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. अकोला रजिस्टर नंबर १०५८ याचा अर्थ यामध्ये सभासदांच्या ठेवी व त्याचप्रमाणे सभासदांना कर्ज सुध्दा दिले जाते. यावरुन हा सर्व सार्वजनिक निधी आहे. व सार्वजनिक निधीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची हानी पोहचू नये किंवा ठेवीदाराचे नुकसान होऊ नये याकरिता वन नमूद केल्याप्रमाणे व सहकारी अधिनियमाप्रमाणे नियंत्रण आहे. प्रसंगी गैर व्यवहार झाल्यास संपुर्ण संचालक मंडळ

बरखास्त करुन प्रशासन नियुक्त करण्यासाठी सुध्दा अधिकार हा जिल्हा उपनिबंधक यांना आहे व त्यामुळेही सदरची सहकारी संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्यामुळे सदरच्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होतो हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. व त्यामुळे सदरच्या सहकारी संस्थेने अधिनियमाचे कलम ५ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे दिनांक ३१.१०.२००६ चा अर्ज हा सदरच्या सहकारी संस्थेकडे दिनांक २२.१२.२००६ रोजी हस्तांतर केल्याप्रमाणे सदरच्या अर्जाप्रमाणे सहाय्यक माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून श्री गजानन शासकिय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. अकोला रजिस्टर नंबर १०५८ यांनी जन माहिती अधिकारी नियुक्त करुन अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३१.१०.२००६ च्या हस्तांतरीत झालेल्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी, श्री गजानन शासकिय दुध योजना कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. अकोला रजिस्टर नंबर १०५८ यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व्यक्तीशः अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांना सदरचा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संस्थेने नियुक्त केलेल्या जन माहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) सदरचा अधिनियम हा सहकारी संस्थेस लागू होत असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन न दिल्यास अपीलकर्ता यांना आयोगाकडे अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल करता येईल.